## MAHARASHTRA ACT No. XII OF 1983

## THE MAHARASHTRA KIDNEY TRANSPLANTATION ACT, 1982

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राष्ट्रपती यांची संमती दिनांक १५ फेब्रुवारी १९८३ रोजी मिळाली असल्यामुळे तो, याद्वारे सर्व लोकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**एम. ए. धोते,**
सचिव, महाराष्ट्र शासन;
विधि व न्याय विभाग.

## MAHARASHTRA ACT No. XII OF 1983

### AN ACT TO MAKE PROVISIONS FOR USE OF KIDNEYS OF DECEASED PERSONS, AND FOR DONATION OF KIDNEYS, FOR THERAPEUTIC PURPOSES

[ राष्ट्रपती यांची संमती मिळाल्यानंतर महाराष्ट्र शासन राजपत्रात दिनांक २४ फेब्रुवारी १९८३ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला ]

## सन १९८३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२

### उपचारशास्त्रीय प्रयोजनांसाठी, मृत व्यक्तींच्या मूत्रपिंडांचा वापर करण्यासाठी आणि मूत्रपिंड दानासाठी तरतूद करण्याकरता अधिनियम

**ज्याअर्थी,** उपचारशास्त्रीय प्रयोजनासाठी, मृत व्यक्तींच्या मूत्रपिंडांचा वापर करण्यासाठी, आणि मत्रपिंड दानासाठी तरतूद करणे आणि त्याशी संबंधित बाबींसाठी तरतूद करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या तेहतिसाव्या वर्षी, याद्वारे, पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

१. (१) या अधिनियमास, महाराष्ट्र मूत्रपिंड प्रतिरोपण अधिनियम, १९८२ असे म्हणता येईल. संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.

(२) तो संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू असेल.

(३) तो, (अ) बृहन्मुंबईत, तात्काळ ; आणि

(ब) राज्याच्या उर्वरित क्षेत्रात किंवा क्षेत्रांमध्ये राज्य शासन, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, नेमून देईल अशा तारखेस अमलात येईल आणि वेगवेगळ्या क्षेत्रांसाठी वेगवेगळ्या तारखा नेमून देता येतील.

व्याख्या. २. संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर, या अधिनियमात,—

(अ) "मान्यताप्राप्त संस्था" म्हणजे, या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी, राज्य शासनाने मान्यता दिली आहे असे उपचारशास्त्रीय प्रयोजनांसाठी असलेले रुग्णालय किंवा वैद्यकीय किंवा अध्यापन संस्था ;

(ब) "जवळचा नातेवाईक" म्हणजे मृत व्यक्तीच्या पुढील नातेवाईकांपैकी म्हणजे पत्नी, पती, वडील, आई, मुलगा, मुलगी, भाऊ किंवा बहीण यापैकी कोणताही नातेवाईक आणि त्यात कोणत्याही अन्य व्यक्तीचा समावेश होणार नाही ;

(क) "नोंदलेला वैद्यक व्यवसायी" म्हणजे, भारतात त्यावेळी अमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये, कोणत्याही वैद्यक पद्धतीचा व्यवसाय करणारा आणि नोंदलेला वैद्यक व्यवसायी म्हणून मान्यता दिलेला व्यवसायी ;

उपचार-शास्त्रीय प्रयोजनां-साठी मृत व्यक्तीचे मूत्रपिंड काढणे.

३. (१) जर कोणत्याही व्यक्तीने, ती हयात असताना कोणत्याही वेळी लेखी स्वरूपात, किंवा तिच्या शेवटच्या आजारपणात दोन किंवा अधिक साक्षीदारांच्या समक्ष तोंडी अशी विनंती केलेली असेल की, तिच्या मृत्यूनंतर तिचे मूत्रपिंड उपचारशास्त्रीय प्रयोजनांसाठी वापरण्यात यावे तर, तिच्या मृत्यूनंतर तिचा मृतदेह कायदेशीरपणे जिच्या ताब्यात असेल अशी व्यक्ती, नंतर विनंती मागे घेण्यात आली होती असे तिला सकारण वाटत नसेल तर, या प्रयोजनासाठी मृतदेहातून मूत्रपिंड काढून घेण्याचा प्राधिकार देईल.

(२) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, मृत व्यक्तीचा मृतदेह कायदेशीरपणे जिच्या ताब्यात असेल अशा कोणत्याही व्यक्तीस,—

(अ) मृत व्यक्तीने, तिच्या मृत्यूनंतर तिच्या मूत्रपिंडाची अशा रीतीने व्यवस्था लावण्यास हरकत घेतलेली होती, आणि अशी हरकत तिने मागे घेतलेली नव्हती; किंवा

(ब) अशा व्यक्तीने मूत्रपिंड काढून घेण्याचा प्राधिकार देण्यापूर्वी, मृत व्यक्तीचा जवळचा नातेवाईक मृत व्यक्तीच्या मूत्रपिंडाची अशा रीतीने व्यवस्था लावण्यास हरकत घेत आहे ;

असे सकारण वाटत नसेल तर, उपरोक्त प्रयोजनांसाठी मृतदेहातून मूत्रपिंड काढून घेण्याचा प्राधिकार देता येईल.

(३) कोणत्याही मृत व्यक्तीच्या बाबतीत या कलमाच्या उपबंधान्वये दिलेला प्राधिकार हा, मृत देहातून मूत्रपिंड काढून घेण्यासाठी व उपरोक्त प्रयोजनासाठी त्यांचा वापर करण्यासाठी पुरेसे अधिपत्र असेल :

परंतु, ज्याने मृहदेहाची जातीने तपासणी करून प्राणोत्क्रमण झाले असल्याची खात्री करून घेतलेली असेल, असा, मान्यताप्राप्त संस्थेत काम करणारा नोंदलेला वैद्यक व्यवसायी किंवा राज्य शासनाने किंवा त्याने याबाबतीत प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याने लेखी मान्यता दिलेला (त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये मान्यता दिलेली शल्यचिकित्सेमधील अर्हता असणारा) नोंदलेला वैद्यक व्यवसायी, यांच्याखेरीज कोणीही अशा प्रकारे मूत्रपिंड काढण्याचे काम करणार नाही.

मृत्यूनंतर एक तासाच्या आत मूत्रपिंड काढून घेण्याचा प्राधिकार.

४. (१) त्यावेळी अमलात असलेल्या कोणत्याही इतर कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, कलम ३ अन्वये मूत्रपिंड काढण्यासाठी प्राधिकार देण्याचा अधिकार असलेल्या व्यक्तीने, कोणत्याही नोंदलेल्या वैद्यक व्यवसायीकडून मृत व्यक्तिस, मृत म्हणून घोषित करण्यात आल्यापासून एक तासाच्या आत, त्या व्यक्तीच्या मृत देहातून मूत्रपिंड काढण्याचा प्राधिकार देणे कायदेशीर असेल.

(२) जो नोंदलेला वैद्यक व्यवसायी मूत्रपिंडदात्याच्या मृत्यूच्या वेळी हजर असेल तो व्यवसायी किंवा असा कोणताही व्यवसायी नसेल त्या बाबतीत, ज्याला तसे करण्यासाठी बोलावण्यात येईल असा कोणताही इतर नोंदलेला वैद्यक व्यवसायी मृत्यूची तारीख व वेळ प्रमाणित करील. परंतु असे प्रमाणित करणारा असा कोणताही व्यवसायी मूत्रपिंड काढण्याच्या किंवा रोपणाच्या कार्यपद्धतीमध्ये सहभागी होणार नाही.

५. (१) जर मृत व्यक्तीचा देह कायदेशीरपणे जिच्या ताब्यात असेल अशा व्यक्तीस, त्यावेळी अमलात असलेल्या कोणत्याही कायद्याच्या उपबंधानुसार मरणान्वेषण किंवा शवचिकित्सा ही आवश्यक आहे असे सकारण वाटत असेल तर, अपमृत्यूनिर्णेता किंवा त्यावेळी अमलात असलेल्या कोणत्याही अन्य कायद्यान्वये अपमृत्यूनिर्णेता म्हणून तत्सम कामे पार पाडणारा कोणताही अन्य अधिकारी यांच्या संमतीने असेल ते खेरीज करून, मूत्रपिंड काढून घेण्यासाठी प्राधिकार देण्यात येणार नाही.

(२) पोट-कलम (१) मध्ये नमूद केलेल्या अपमृत्यूनिर्णेत्यास किंवा अशा अन्य अधिकाऱ्यास एखाद्या व्यक्तीच्या मृत्यूपूर्वी किंवा तिच्या मृत्यूनंतर ताबडतोब त्या व्यक्तीच्या मृत्यूनंतर तिच्या देहातून मूत्रपिंड काढून घेण्यासाठी त्याची संमती आवश्यक नाही असा निदेश देता येईल.

(३) अपमृत्यूनिर्णेत्याची किंवा अशा इतर अधिकाऱ्याची संमती किंवा निदेश, अशा संमतीत किंवा निदेशात विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा शर्तींच्या अधीन राहून देण्यात येईल. अशी संमती किंवा निदेश, अपमृत्यूनिर्णेत्याकडून किंवा अशा इतर अधिकाऱ्याकडून तोंडी देता येईल, परंतु तोंडी संमती किंवा निदेश दिल्यापासून अठ्ठेचाळीस तासांच्या आत, अशी संमती किंवा निदेश त्याच्याकडून लेखी स्वरूपात कायम करण्यात येईल.

मरणान्वेषण किंवा शवचिकित्सा यांच्या बाबतीतील शंका, अपमृत्यू निर्णेत्याकडे किंवा अपमृत्यू-निर्णेता म्हणून तत्सम कामे पार पाडणाऱ्या अधिकाऱ्याकडे विचारार्थ पाठविणे.

६. दुसऱ्या व्यक्तीने फक्त दफन किंवा दहनविधी करण्यासाठी ज्या व्यक्तीकडे मृत व्यक्तीचे शरीर स्वाधीन केले असेल त्या बाबतीत, त्या व्यक्तीला, मृत व्यक्तीच्या शरीरातून मूत्रपिंड काढण्यास कलम ३ अन्वये कोणताही प्राधिकार देता येणार नाही.

जेव्हा मृत देह दहन इत्यादी-करिता व्यक्तीच्या स्वाधीन करण्यात येईल तेव्हा मूत्रपिंड काढण्याचा प्राधिकार नसणे.

७. एखाद्या मान्यताप्राप्त संस्थेत हक्क न सांगितलेला मृत देह पडून असेल किंवा त्यावर हक्क न सांगितला जाण्याचा संभव असेल त्या बाबतीत, मान्यताप्राप्त संस्थेचे नियंत्रण अथवा व्यवस्थापन स्वाधीन असलेल्या व्यक्तीच्या वतीने त्या बाबतीत तिने पदनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याला किंवा व्यक्तीला या अधिनियमान्वये मूत्रपिंड काढण्यासंबंधातील कोणताही प्राधिकार देता येईल.

मान्यताप्राप्त संस्थेत हक्क न सांगितलेला मृत देह पडून असेल तेव्हा मूत्रपिंड काढण्याचा प्राधिकार.

८. (१) या अधिनियमाच्या पूर्वगामी उपबंधांमधील कोणत्याही मजकुराचा अर्थ, मृत व्यक्तीच्या मूत्रपिंडाबाबतची जी कार्यवाही, हा अधिनियम संमत करण्यात आला नसता तर कायदेशीर ठरली असती, अशी कार्यवाही बेकायदेशीर ठरते असा लावण्यात येणार नाही.

व्यावृत्ती.

१८६० चा ४५. (२) या अधिनियमाच्या उपबंधानुसार मूत्रपिंड काढण्यासाठी दिलेला कोणताही प्राधिकार हा भारतीय दंड संहितेच्या कलम २९७ मधील उपबंधाचे उल्लंघन म्हणून समजण्यात येणार नाही.

९. या अधिनियमास अथवा तदन्वये केलेल्या नियमांस अनुसरून सदभावपूर्वक केलेल्या किंवा करण्याचा हेतु असलेल्या कोणत्याही कृत्याबद्दल मृत व्यक्तीच्या देहाचा कायदेशीरपणे ताबा असलेली मान्यताप्राप्त संस्था अथवा एखादी व्यक्ती अथवा अपमृत्यूनिर्णेता अथवा अपमृत्यूनिर्णेत्या-सारखीच कामे पार पाडणारा कोणताही इतर अधिकारी अथवा मान्यताप्राप्त संस्थेचा किंवा शासनाचा अथवा स्थानिक प्राधिकरणाचा कोणताही अधिकारी अथवा नोंदलेला कोणताही वैद्यक व्यवसायी यांच्याविरुद्ध दावा, खटला, अथवा इतर कोणतीही कायदेशीर कारवाई दाखल करता येणार नाही.

या अधि-नियमान्वये सद्भावपूर्वक कृत्य करणाऱ्या व्यक्तीचे संरक्षण.

नियम. १०. (१) राज्य शासनास, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, आणि पूर्वप्रसिद्धीच्या शर्तीस अधीन राहून, या अधिनियमाचे उपबंध अमलात आणण्याच्या प्रयोजनास्तव नियम करता येतील.

(२) विशेषेकरून, आणि पूर्वगामी उपबंधांच्या सामान्यतेस बाध न आणता, अशा नियमामध्ये पुढील तरतुदी करता येतील :—

(अ) मृत व्यक्तीचा देह कायदेशीर रीत्या ताब्यात असणाऱ्या व्यक्तीला, उपचारशास्त्रीय प्रयोजनांसाठी मुत्रपिंड काढण्यास ज्या नमुन्यात व ज्या रीतीने प्राधिकार देता येईल तो नमूना व ती रीत ;

(ब) मृत व्यक्तीच्या मूत्रपिंडाचा उपचार शास्त्रीय प्रयोजनास्तव वापर करण्यास, मृत व्यक्तीच्या जवळच्या नातेवाईकास ज्या नमुन्यात व ज्या रीतीने आक्षेप घेता येईल तो नमुना व ती रीत ;

(क) मान्यताप्राप्त संस्थेचे नियंत्रण व व्यवस्थापन स्वाधीन असलेल्या व्यक्तीच्या वतीने, तिने, या बाबतीत पदनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याला किंवा व्यक्तीला, या अधिनियमान्वये मूत्रपिंड काढण्यास ज्या नमून्यात व ज्या रीतीने प्राधिकार देता येईल तो नमुना व ती रीत ;

(ड) मृत व्यक्तीच्या शरीरातून मूत्रपिंड काढण्याकरिता अपमृत्यूनिर्णत्याला अथवा अपमृत्यूनिर्णत्याची कामे पार पाडण्याऱ्या कोणत्याही इतर व्यक्तीला ज्या रीतीने संमती देता येईल ती रीत ;

(ई) या अधिनियमाखालील नियमांद्वारे विहित करावयाची किंवा विहित करता येईल अशी इतर कोणतीही बाब.

(३) ह्या कलमान्वये करण्यात आलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर शक्य असेल तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन अधिवेशनात एकूण तीस दिवसांची होईल इतक्या मुदतीकरिता राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी त्या नियमात कोणताही फेरबदल करण्यास दोन्ही सभागृहे कबूल होतील किंवा नियम करू नये म्हणून दोन्ही सभागृहे कबूल होतील व असा निर्णय शासकीय राजपत्रात अधिसूचित करतील तर, अशा अधिसूचनेच्या तारखेपासून अशा फेरबदल केलेल्या स्वरूपातच नियम यथास्थिती अंमलात येतील किंवा येणार नाहीत. तथापि, असे कोणतेही फेरबदल किंवा विलोपन यामुळे त्या नियमान्वये पूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

(यथार्थ अनुवाद),

न. ब. पाटील,

भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य.